महाराष्ट्र शासन
सांस्कृतिक कार्य संचालनालय
जुने सचिवालय, पहिला मजला, विस्तार भवन, महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ०३२
वेबसाईट: www.mahasanskruti.org ई-मेल : mahaculture@gmail.com
दूरध्वनी क्र ०२२: २२८४२६७०/३४ , २२०४३५५०/७१

---

क्र.सां.का.सं./आस्था/ २८२३ दिनांक: 26 MAY 2025

वाचा :- विकसित महाराष्ट्र २०४७ अंतर्गत १५० दिवस उपक्रम- विकसित महाराष्ट्र Vision Document तयार करण्याबाबत मार्गदर्शक सुचना.

## परिपत्रक

विषय :- विकसित महाराष्ट्र २०४७ अंतर्गत विकसित महाराष्ट्र Vision Document तयार करण्यासाठी नागरिकांकडून सुचना मागविणेबाबत.

विकसित महाराष्ट्र २०४७ या उपक्रमाअंतर्गत Vision Document तयार करण्याबाबत राज्य शासनाचे निर्देश आहेत. त्यात खालीलप्रमाणे तीन भाग आहेत.

१. Long-term Vision of १५ August २०४७ (Bharat @१००)

२. Medium-term Vision of ९ May २०३५ (Maharashtra@७५)

३. Short-term Vision of २ October २०२९ (With Annual targets)

वरील प्रमाणे Vision Document तयार करण्यासाठी शासनाच्या निर्देशानुसार या कार्यालयात समिती स्थापन करण्यात आलेली आहे. माहे मे २०२५ पासून ते ०२ ऑक्टोबर २०२५ पर्यंत या १५० दिवसांत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयास खालील ३ मुद्यांच्या अनुषंगाने कार्यवाही करावयाची आहे.

अ) विकसित महाराष्ट्र २०४७ Vision Document

ब) e- Governance Reforms

क) सेवा विषयक प्रशासकीय सुधारणा

उपरोक्त "अ" प्रमाणे विकसित महाराष्ट्र २०४७ Vision Document तयार करण्यासाठी सांस्कृतिक कार्य क्षेत्राशी संबंधित सांस्कृतिक कार्यासंबंधीच्या योजना , राज्य नाट्य स्पर्धा, संगीत, नृत्य, तमाशा, कीर्तन, भजन, लोककला ,विविध शिबिरे, वृध्द कलाकारांना आर्थिक मदत ,सांस्कृतिक कार्य क्षेत्रात कार्य करीत असलेल्या संस्थांना अनुदान या संबंधित भविष्यात होणारे बदल विचारात घेऊन त्या अनुषंगाने आवश्यक त्या अपेक्षित सुधारणाच्या अंमलबजावणीसाठी सांस्कृतिक क्षेत्राशी सबंधित नागरिकांकडून नाविन्यपुर्ण सुचना या परिपत्रकाद्वारे मागविण्यात येत आहेत.

Scanned with OKEN Scanner

सदर सुचनांवर समितीतील तज्ञांची चर्चा होऊन अंतिम आहवाल तयार करून तो शासनास सादर करण्यात येणार आहे.

सांस्कृतिक कार्य क्षेत्राशी संबंधित अभिप्राय/सूचना नागरिकांनी या कार्यालयाच्या mahaculture@gmail.com या ईमेलवर दि. १५ जून, २०२५ पर्यत पाठविण्यावावत आवाहन करण्यात येत आहे.

(श्रीराम पांडे)
सहसंचालक
सांस्कृतिक कार्य संचालनालय,मुंबई

Scanned with OKEN Scanner